सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन,गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक सीसीटी-३६२०/प्र.क्र.०४/ E-७४८५२०/ भाग-२/पोल-३, दि.०७/०१/२०२६

**विषय**:- राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. पीडब्ल्युसी या कंपनीला मुदतवाढ देणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक सीसीटी-३६२०/प्र.क्र.०४/E७४८५२०/ भाग-२/पोल-३, दि.०७/०१/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०१०७१७४०२१३०२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 09-01-2026 17:54:16

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
कार्यासन अधिकारी, का.क्र. १७

प्रत,
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक ( नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. पीडब्ल्युसी या कंपनीला मुदतवाढ देणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीसीटी-३६२०/प्र.क्र.०४/E-७४८५२०/भाग-२/पोल-३,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, २ रा मजला, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०७.०१.२०२६

**वाचा:**

१. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे क्रिमीनल रिट पिटीशन क्र. २११०/२०१४ वरील दि. १३.८.२०१४, दि. २१.१०.२०१५, दि. २४.२.२०१६, दि,२१.९.२०१६, दि. ३१.११.२०१६, दि.१४.१२.२०१८, दि. ११.२.२०१९, व दि. ४.३.२०१९ रोजीचे आदेश.
२. मा. सर्वोच्च न्यायालयाचे क्रिमीनल रिट पिटीशन क्र. ५३९/१९८६ वरील दि. २४.७.२०१५ रोजीचा न्यायनिर्णय.
३. गृह विभाग शासन निर्णय क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३, दि.२३.११.२०१५, दि.२६.३.२०१८,दि. २०.६.२०१८, दि.११.१०.२०१८, दि.१४.११.२०१९, व दि.११.१२.२०१९.
४. गृह विभाग शासन पत्र क्र. सीसीटी-३६२०/प्र.क्र.४/भाग-१/पोल-३, दि.१.८.२०२२, दि.१२.७.२०२३
५. शासन निर्णय क्रमांक : सीसीटी-३६२०/प्र.क्र.०४/E-७४८५२०/भाग-२/पोल-३, दि.२१.३.२०२४. दि.१०.७.२०२४. दि.२८.८.२०२४, दि.२४.२.२०२५.
६. अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक ६.११.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त, कार्या. पोल-३ चे दि.२०.११.२०२५ चे पत्र.
७. माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, शासन निर्णय क्रमांक: GAD - मातंस ०८०/४/२०१४-O/O Directorate of IT-DIT (MH), दिनांक १.७.२०१४,दिनांक ९.१०.२०१७ व दिनांक ९.५.२०१९ व परिपत्रक दि. २४.४.२०२३, व शासन निर्णय दिनांक ५.१०.२०२३.
८. पोलीस महासंचालक कार्यालयाचे पत्र क्रमांक : पोमसं/१७/प्रकल्प सल्लागार पीडब्ल्युसी - देयके/१०२/२०२३, दि.११.१२.२०२५.

**प्रस्तावना:**

लिओनार्ड झेविअर वल्दारीस व इतर यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे क्रिमीनल रिट पिटीशन क्र. २११०/२०१४ दाखल केली. मा. उच्च न्यायालयाने या यांचिकेत दि. १३.८.२०१४, दि. २४.२.२०१६, दि. ३०.११.२०१६ दि. १४.१२.२०१८, दि. ११.२.२०१९ व दि. ४.३.२०१९ रोजी आदेश पारीत केले आहेत. मा. उच्च न्यायालयाने पोलीस कोठडीतील मृत्यू रोखण्यासाठी राज्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यांमधील प्रत्येक कॉरीडॉर, रुम व लॉकअप यामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत आदेशीत केले आहे. तसेच डी.के. बसू व इतर यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात पश्चिम बंगाल राज्य आणि इतर यांचेविरुध्द क्रिमीनल रिट पिटीशन क्र. ५३९/१९८६ या प्रकरणी दि.२४.७.२०१५ रोजी निर्णय दिला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने संवेदनशील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविणेबाबत निदेश दिलेले आहेत.

राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी “प्रकल्प सल्लागार” म्हणून “मे. पीडब्ल्युसी लि.(M/s. Pricewaterhouse coopers Ltd.)” या सल्लागार कंपनीच्या १ वरिष्ठ सल्लागारास व १ सल्लागारास दिनांक २०.१२.२०१९ रोजीच्या शासन पत्रान्वये दिनांक २०.१२.२०१९ ते १९.२.२०२० पर्यंत दरमहा प्रती व्यक्ती (Man-Month) तत्वावर नियुक्ती देण्यात आली असून सदर कंपनीस कार्यादेश देण्यात आले.

| अ.नं. | शासन आदेश / शासन निर्णय दिनांक | सल्लागाराचा तपशील | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | २० डिसेंबर २०१९ | १ वरिष्ठ सल्लागार + १ सल्लागार | २० डिसेंबर २०१९ ते १९ फेब्रुवारी २०२० |
| २. | ०३ फेब्रुवारी २०२१ | ६ वरिष्ठ सल्लागार | प्रकल्प पूर्णपणे कार्यान्वित (Go-Live) होईपर्यंत |
| ३. | ०१ ऑगस्ट २०२२ | १ वरिष्ठ सल्लागार + १ सल्लागार | १ ऑगस्ट २०२२ ते ३१ डिसेंबर २०२२ |
| ४. | १२ जुलै २०२३ | १ वरिष्ठ सल्लागार + १ सल्लागार | १ जानेवारी २०२३ ते १९ सप्टेंबर २०२३ |
| ५. | २१ मार्च २०२४ | १ सल्लागार + १ सहयोगी सल्लागार | २० सप्टेंबर २३ to ३१ मार्च २०२४ |
| ६. | १० जुलै २०२४ | २ सहयोगी सल्लागार | १ एप्रिल २०२४ to ३० जून २०२४ |
| ७. | २८ ऑगस्ट २०२४ | २ सहयोगी सल्लागार + १ वरिष्ठ सल्लागार + १ सल्लागार (फेज-३-RFP प्रसिध्दीनंतर) | १ जुलै २०२४ ते ३० सप्टेंबर २०२४ |
| ८. | २४ फेब्रुवारी २०२५ | २ सहयोगी सल्लागार + १ वरिष्ठ सल्लागार + १ सल्लागार (फेज ३-RFP प्रसिध्दीनंतर) | १ ऑक्टोंबर २०२४ ते ३० सप्टेंबर २०२५ |
| ९. | दि.६.११.२०२५ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीत | १ वरिष्ठ सल्लागार + २ सहयोगी सल्लागार | १ ऑक्टोंबर २०२५ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. |

अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.६.११.२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये The Committee approved the extension of the PwC॰s Project Management Consultancy services for ३ resources (i. e.) २ Associate Consultants + १ Senior Consultant) for the period from १ October २०२५ to ३० September २०२६ in line with the DIT GR “ Government

Resolution No. GAD-IT ०८०/४/२०१४-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH)" dated ५th October २०२३ & its subsequent amendments. असा निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार पोलीस महासंचालक कार्यालयाकडून दि.११.१२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार पोलीस स्टेशन सीसीटीव्ही प्रकल्पासाठी Operation Management of Phase १ & २ of the project करिता तसेच Phase ३ of the Project साठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे.प्राईस वॉटर हाऊस कुपर प्रा. लि., या कंपनीच्या दोन सहयोगी सल्लागार व एक वरिष्ठ सल्लागार यास पूर्णवेळ तत्वावर दि.१.१०.२०२५ ते दि.३०.९.२०२६ पर्यंत माहिती तंत्रज्ञान विभागाच्या उक्त नमूद दि.५.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयास अनुलक्षून मुदतवाढ देण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक आहे. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय</u> :**

पोलीस स्टेशन सीसीटीव्ही प्रकल्पासाठी Operation Management of Phase १ & २ of the project करिता तसेच Phase ३ of the Project साठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे.प्राईस वॉटर हाऊस कुपर प्रा. लि., या कंपनीच्या दोन सहयोगी सल्लागार व एक वरिष्ठ सल्लागार यास पूर्णवेळ तत्वावर दि.१.१०.२०२५ ते दि.३०.९.२०२६ पर्यंत माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि.५.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयास अनुलक्षून मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. उपरोक्त सल्लागारांना देण्यात येणारे मानधन व इतर भत्ते माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या संदर्भ क्र.७ येथे नमूद दि.५.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार देय राहील. तथापि, माहिती व तंत्रज्ञान विभागाने सल्लागारांच्या मानधनासंदर्भात भविष्यात काही सुधारणा केल्यास सदर सुधारणा उपरोक्त सल्लागारांना लागु राहतील. तसेच त्यासाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाने सदर कंपनीची नेमणूक (Empanelment) करणे आवश्यक राहील.

३. यासाठी होणारा खर्च "मागणी क्रमांक बी-१०, ४०५५-पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० - इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) या अंतर्गत, १३-कार्यालयीन खर्च या लेखाशीर्षाखालील त्या-त्या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.६.११.२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार पोलीस महासंचालक कार्यालयाकडून दि.११.१२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे प्रस्तावित केल्यानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०१०७१७४०२१३०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2026.01.07 17:42:56 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
१०. प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर.
१२. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४. मे. पीडब्ल्युसी प्रा.लि.(Pricewaterhouse Coopers Pvt. Ltd.), २५२,वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर (पश्चिम), मुंबई-४०० ०२८.
१५. कक्ष अधिकारी (व्यय-७ / वित्तीय सुधारणा-१), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. अर्थ-१ शाखा, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. निवडनस्ती / पोल- ३.